पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

दूरध्वनी : ०२१७-२७४४७७१/७२/७३ (११ लाईन्स), Ext- १२५ फॅक्स : ०२१७-२३५१३०

संकेतस्थळ : www.sus.ac.in ई मेल phd@sus.ac.in

NAAC Accredited 2022 'B++' Grade (CGPA 2.96)

संशोधन विभाग

Research Section


संदर्भ क्र. पुअहोसोविसो/शै.सं.व.वि./संशोधन विभाग/२०२६/ 3520

दिनांक :- 21 APR 2026

**अत्यंत महत्वाचे**

प्रति,
प्राचार्य/संचालक,
संलग्नित महाविद्यालय/मान्यताप्राप्त संस्था/प्रस्तुत विद्यापीठ संकुले,
पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

**विषय :** पीएच.डी. मार्गदर्शकांकडील प्रवेश क्षमतेबाबतची माहिती व संशोधन केंद्राची अद्ययावत माहिती Edulab Software प्रणालीमध्ये ऑनलाईन पध्दतीने भरण्याबाबत.

**संदर्भ :** १. प्रस्तुत विद्यापीठाचे पत्र क्र. पुअहोसोविसो/शै.सं.व.वि./संशोधन विभाग/२०२६/२३९२ दि. १७-३-२६ रोजीचे पत्र

२. प्रस्तुत विद्यापीठाचे पत्र क्र. पुअहोसोविसो/शै.सं.व.वि./संशोधन विभाग/२०२६/२८९४ दि. ०२-४-२६ रोजीचे पत्र

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये (PET १०) प्रवेश प्रक्रियेकरीता संलग्नित पदव्यूत्तर (PG) महाविद्यालयात (संशोधन केंद्र मान्यता असलेल्या) पूर्णवेळ कार्यरत मार्गदर्शकांची प्रवेश क्षमतेबाबची माहिती व संशोधन केंद्राची अद्ययावत माहिती Edulab Software प्रणालीमध्ये महाविद्यालयाकडील लॉगीनमधून भरुन आवश्यक ती सर्व कागदपत्रे अपलोड करुन दि. ३०/०३/२०२६ पर्यंत ऑनलाईनरित्या सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले होते. तथापि ब-याच महाविद्यालयांनी सदर माहिती मुदतीत भरली नसल्याचे विद्यापीठाच्या निदर्शनास आल्याने संदर्भ क्र. २ अन्वये विषयांकित माहिती भरुन आवश्यक ती सर्व कागदपत्रे अपलोड करण्यास दि. १३/०४/२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती, तरीही ब-याच महाविद्यालयांनी सदर माहिती भरुन आवश्यक ती कागदपत्रे मुदतीत ऑनलाईनरीत्या अपलोड केली नसल्याचे निदर्शनास आलेले आहे.

त्याअनुषंगाने आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, आपल्या पदव्यूत्तर (PG) महाविद्यालयात (संशोधन केंद्र मान्यता असलेल्या) पूर्णवेळ कार्यरत मार्गदर्शकांची पीएच.डी. (PET १०) प्रवेश क्षमतेबाबची माहिती व संशोधन केंद्राची अद्ययावत माहिती Edulab Software प्रणालीमध्ये महाविद्यालयाकडील लॉगीनमधून भरुन आवश्यक ती सर्व **(१) पी.जी. शिक्षक व पीएच.डी. मार्गदर्शक मान्यता पत्र २) संलंग्नता विभागाकडून प्राप्त होणारे वैध पीजी. अभ्यासक्रम मान्यता पत्र ३) Specilization एका पेपरवर नमूद करुन त्याखाली स्वाक्षरी करुन अपलोड करणे ४) संबंधित विषयाचे वैध पीएच.डी. संशोधन केंद्र मान्यता पत्र)** इत्यादी कागदपत्रे अपलोड करुन दि. ३०/०५/२०२६ पर्यंत ऑनलाईनरित्या सादर करण्यास पुनश्च मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर मुदतीत पात्र मार्गदर्शकांची माहिती विहित वेळेत विद्यापीठास प्राप्त न झाल्यास त्या संबंधित मार्गदर्शक यांच्या नावाचा समावेश PET १० प्रक्रियेमध्ये करण्यात येणार नाही, त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत मार्गदर्शक व प्राचार्य / संशोधन केंद्र याची राहिल, याची नोंद घ्यावी. तसेच यासंदर्भात काही तांत्रिक अडचण असल्यास ९१५२२५२०४५ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क करावा.

आपला स्नेहांकित,

(डॉ. म. स. रोकडे)
उपकुलसचिव

प्रत : १) मा. कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ. २) मा. प्र-कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) गोपनीय फर्म यांना सदर पत्राची प्रत देऊन कळविण्यात येते की, वरीलप्रमाणे ऑनलाईन लिंक दि. ३०/०५/२०२६ रात्री . १२:०० वाजता बंद करण्यात यावी.

H:\Dr. Shirish Bandgar\PET 10\Letter_Pet_9.docx

Scanned with OKEN Scanner